# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक : २८.०३.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता
# आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : २**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन २०१५-२०१६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१६-२०१७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

---

**ठराव क्रमांक : ६७१५** **दिनांक : २८/०३/२०१६**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०१५-२०१६ चा सुधारित अर्थसंकल्प रक्कम रु. **५३४.७७** कोटी रक्कमेच्या तूटीच्या व सन २०१६-२०१७ चा अर्थसंकल्प रक्कम रु.**१०८७.७१** कोटी शिलकेचा मान्य करण्यात आला. अर्थसंकल्प मंजूर करताना पुढील सूचना देण्यात आल्या आहेत.

१) प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील मंडळांनी अर्थसंकल्पात प्रस्तावित केल्याप्रमाणे तयार घरांचे ताबे लवकरात लवकर वाटप करुन म्हाडाचा गुंतलेला निधी विक्रीव्दारे वसूल करावा.
२) बांधकाम कार्यक्रमास मंडळांनी आणखी गती व वाढ करावी.
३) संगणकीकरणाच्या उद्दिष्टासाठी पुरवणी मागण्यांव्दारे अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.
४) मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाने त्यांच्या येणे रक्कमा वसुलीसाठी विशेष मोहिम घ्यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

**बाब क्रमांक : ३**

**विषय :- महाराष्ट्र निवारा निधीचे सन २०१५-१६ सुधारित अंदाज व सन २०१६-१७ वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

---

**ठराव क्रमांक : ६७१६** **दिनांक : २८/०३/२०१६**

एकमताने निर्णय घेतला की, शासन निर्णय क्र. नानिपं २००८/ प्र.क्र२१३/गृनिधो-२, दि. ३१/०५/२०१० नुसार महाराष्ट्र निवारा निधीचे लेखे स्वतंत्र प्रत्येक वर्षी विधान मंडळास सादर करावयाचे असल्याने महाराष्ट्र निवारा निधीचा अर्थसंकल्प म्हाडा अर्थसंकल्पात अंर्तभूत न करता, महाराष्ट्र निवारा निधीचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. महाराष्ट्र निवारा निधीचे सन २०१५-१६ सुधारित व सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

**बाब क्रमांक : ५**

**विषय :उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा या कार्यालयाकरीता उपनिबंधक सहकारी संस्था, (गट-अ) व इतर अधिनस्त पदे तसेच, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील पदे आकृतीबंधात वाढविणेबाबत.**

---------------------------------------------------------------

**ठराव क्रमांक : ६७१७** **दिनांक : २८/०३/२०१६**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, सध्या कार्यरत असलेल्या उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा या कार्यालयाचे प्रस्तावित केल्यानुसार विभाजनास आणि सहकार विभागाकडील उपरोक्त पदे म्हाडाच्या आकृतीबंधात वाढविणेस तत्वत: सहमती दर्शवून पदनिर्मितीबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यास मंजूरी देण्यात आली.